श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित आरोग्य पर्यवेक्षक, यांचे अनाधिकृत गैरहजेरी प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेबावत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/८८६/२०२५
अहिल्यानगर दिनांक- ०७/१०/२०२५

वाचाः- १.गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/१६९९/२०२५, दिनांक-०७/०७/२०२५
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. आरोग्य/आस्था-३/६५९/२०२५, दिनांक- ०२/०८/२०२५
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहाता यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/१००६/२०२५, दिनांक- १३/०८/२०२५
४. श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित आरोग्य पर्यवेक्षक, यांचा दिनांक- ११/०८/२०२५ रोजीचा खुलासा
५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) नुसार

श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित तत्कालीन आरोग्य पर्यवेक्षक, हे पंचायत समिती अकोले येथे कार्यरत असताना कार्यालयीन नियमित कामकाजात व साथरोग परिस्थितीमध्ये अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीपणा या सारखे गैरवर्तन केले असलेने सेवा निलंबित करणे आले होते. याबाबत संदर्भ क्र.१ चे पत्रासोबत दोषारोप सादर केलेले आहे. सदर दोषारोपाचे अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयाकडील ज्ञापन/दोषारोप संदर्भ क्र.४ चे खुलाशान्वये ठेवण्यात आलेले आरोप स्पष्टपणे मान्य किंवा अमान्य केलेले नाहीत. श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित आरोग्य पर्यवेक्षक, यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी विशेष चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

पुढील पानावर...

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (७) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. 202510011002486 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 01-10-2025 13:56:28
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती अकोले, व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

३. श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित आरोग्य पर्यवेक्षक, व्दारा- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.विनोद भागोराव भिसे, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर